जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:२१ सप्टेंबर, २०२२

---

जळगाव दि.२१ (प्रतिनिधी) डिजीटल तंत्रज्ञानाच्या वाढलेल्या वापरामुळे सायबर सुरक्षितेबाबत जागरुकता केल्यास गुन्ह्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल असे मत प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी सायबर सुरक्षितता आणि जागरुकता या विषयावरील कार्यशाळेत बोलतांना व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फौडेशन,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि.२१ सप्टेंबर रोजी ही कार्यशाळा विद्यापीठात आयोजित करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर जळगाव सायबर सेलचे पोलिस उपनिरीक्षक दीगंबर थोरात, क्विक हिल फौंडेशन चे महेश भरडी, महाराष्ट्र पोलिसचे सचिन सोनवणे व दिलीप चिंचोले, प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर.कोल्हे, प्रा.मनीष जोशी, प्रा.अजय पाटील हे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना प्रा.इंगळे म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा दुरुपयोग केल्यामुळे सायबर गुन्हे घडत आहे. याबाबत जागरुकता व्हावी यासाठी क्विक हिल फौडेशनने कमवा व शिका योजना संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली आहे. या योजनेतून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन प्रशिक्षीत विद्यार्थ्यांकडून शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबतची जागरुकता केली जाते. सायबर सेलचे श्री. दिगंबर थोरात म्हणाले की, सायबर सुरक्षिततेबाबतची जागरुकता करण्याचे काम पोलिसांचे आहे मात्र हे प्रशिक्षित विद्यार्थी हे सायबर जागरुकता समाजापर्यंत पोहचवित आहे. त्यामुळे सायबर गुन्हे कमी होण्यास मदत होईल. क्विक हिल फौंडेशनचे महेश भरडी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेतील ज्ञान संपादित करुन अधिकाधिक लोकांमध्ये जागरुकता निर्माण करावी. प्रास्ताविक करतांना प्रा.राजू आमले यांनी सांगितले की, विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्यात २०१८ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. २०१८-१९ पासून हया उपक्रमातून समाजातील एक लाख पेक्षा अधिक लोकांमध्ये सायबर जागरुकतेचे कार्य करण्यात आले आहे. सूत्रसंचालन अश्वीनी पाटील व कुंदन गोसावी यांनी केले.

पुढील सत्रात महेश भरडी, दिगंबर थोरात, सुगंधा दाणी यांची सायबर सुरक्षितता आणि जागरुकता या विषयावरील व्याख्याने झाली. या कार्यशाळेत १०० पेक्षा अधिक विद्यार्थी – विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.

## बातमी क्र.२

जळगाव दि.२१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योग मार्गदर्शन केंद्र, क्रीडा विभाग आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या निवासी शिबीरात मंगळवार दि. २० सप्टेंबर रोजी प्रात्यक्षिकांसह 300 विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर योग मार्गदर्शक केंद्राचे प्रमुख अभि. राजेश पाटील, समुपदेशन तज्ज्ञ डॉ.वीणा महाजन, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी विनीता सोनवणे, डॉ.लीना चौधरी उपस्थित होते. यावेळी बोलतांना श्री. पाटील म्हणाले की, शहरी वातावरण, बदललेली भाषा, विद्यापीठाचे भव्य वातावरण हे विद्यार्थ्यांसाठी नवीन असून भविष्यातील स्पर्धांना सामोरे जाण्याची भीती, व्यासपीठावर उभे राहण्याची भीती, स्वतःला व्यक्त करण्याची भीती या सर्व बाबींना हेरून या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता समुपदेशनाची गरज आहे. डॉ. वीणा महाजन यांनी विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिकासह समुपदेशन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार योगशिक्षक कृणाल महाजन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अश्विन सोनवणे, भगवान पाटील, रत्नाकर सोनार आदींचे सहकार्य लाभले.

-------------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता